M. S. C. T. D. C. Ltd. Nashik
Finance Branch.
3867
21/9/04
Jr. Asstt. (Accts.)

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा कारभार सक्षम करण्यासाठी उपाय योजना करणे.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय, क्र. आविम-२००४/प्र.क्र.१५/का.३
मंत्रालय विस्तार, मुंबई-३२
दिनांक :- २४ ऑगस्ट, २००४

प्रस्तावना :- महाराष्ट्र शासनाच्या सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पीय भाषणात मागासवर्गीय घटकाच्या योजना राबविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध महामंडळांचा कारभार सक्षम होण्याच्या दृष्टीने उचित कार्यवाही करणे, तसेच विविध केंद्रीय वित्तीय महामंडळाकडून प्रत्यक्ष कर्ज मिळणे सुलभ व्हावे यासाठी आवश्यक पावले उचलण्याचे धोरण जाहिर करण्यात आले होते. त्यानुषंगाने आदिवासी विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत असलेली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ ही दोन महामंडळे सक्षम करण्यासाठी काही उपाय योजना करण्यासंबधीची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर विचार होवून शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :-

१) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ या दोन्ही महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल प्रत्येकी रु.१०० कोटी वरुन प्रत्येकी रुपये २०० कोटी इतके करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२) सदर दोन्ही महामंडळांना दरवर्षी प्रत्येकी रु.२०.०० कोटी इतके भाग भाडवल देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

३) आदिवासी विकास महामंडळास देण्यात येणाऱ्या व्यवस्थापकीय अनुदानाची मुदत संपलेली असल्यामुळे सदर महामंडळास सन २०१२ पर्यंत व्यवस्थापकीय अनुदान देण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

४) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ या दोन्ही महामंडळांना मिळणारे व्यवस्थापकीय अनुदान प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे १००% वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. याबाबत दोन्ही महामंडळाच्या व्यवस्थापकीय खर्चाची छाननी करुन महामंडळाच्या आस्थापनेवरील पदांच्या मानकांचा आढावा घेवून तत्संबधीचा प्रस्ताव महामंडळाने शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

Adm. Branch
1 SEP 2004

CR-15-04 CR-15-04 23

५) वरील दोन्ही महामंडळाचे भाग भांडवलाची तरतूद वितरित करण्यास आदिवासी विकास विभागास प्राधिकृत करण्यात येत आहे. या दोन्ही महामंडळाचा भांडवली अर्थसंकल्प नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने मंजूर करण्यात येईल.

६) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या योजनांसाठी एन. एस. टी. एफ. डी. सी. कडून घेतलेल्या थकीत कर्जाच्या परतफेडीसाठी विशेष भाग भांडवल निधी मंजूर करण्यात येईल. याबाबत समर्थनासह स्वयंस्पष्ट प्रस्ताव महामंडळाकडून प्राप्त होणे आवश्यक आहे.

७) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या स्वयंरोजगाराच्या योजनांसाठी शासनाकडून अनुदान निधी मंजूर करण्यात येईल. याबाबत देखील महामंडळाकडून योग्य समर्थनासह स्वयंस्पष्ट प्रस्ताव प्राप्त होणे आवश्यक आहे.

८) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत रु. २५,०००/- पर्यंतचे कर्ज (अनुदान विरहित) २ % व्याज दराने देण्याची नवीन योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात येईल. तथापि, या योजनेच्या अटी व शर्ती निश्चित करुन त्यास शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावे. महामंडळाने याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करावा.

३. वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने लागणाऱ्या आर्थिक तरतूदीसंबंधीचे प्रस्ताव महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने शासनास वेळोवेळी सादर करावेत.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २७१ साऊ, दिनांक १६.७.२००४ व अनौपचारिक संदर्भ क्र.७३४/०४/व्यय-१४, दिनांक १६.७.२००४ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(ज.ल. पावरा)
अवर सचिव

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. प्रधान सचिव (आ.वि.)

सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.नाशिक
व्यवस्थापकीय संचालक, शबरी वित्त व विकास महामंडळ मर्या.नाशिक
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई (व्यय-१४, साऊ)
महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र १-२ , मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १-२, मुंबई /नागपूर
आदिवासी विकास विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती (का.३)

*****-------******